# महाराष्ट्र शासन

E-mail-rajendra.jadhav62@nic.in
दूरध्वनी क्र.०२२-२२८५५७६६

क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२७-१७/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४ था मजला, ४३१ (विस्तार),
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २८.०२.२०१७

प्रति,

संचालक ( उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय ), महाराष्ट्र राज्य.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
उपसचिव ( महाविद्यालयीनशिक्षण /विद्यापीठशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालये),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

विषय : वन विभागाच्या " महाराष्ट्र हरित सेना योजनेच्या " संकेत स्थळावर सदस्य नोंदणी करण्याबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबतचे महसूल व वन विभागाचे दि. २१ जानेवारी, २०१७ रोजीचे अ.शा.पत्र व मा.मंत्री, वित्त आणि नियोजन, वने यांचे दि.३१/०१/२०१७ रोजीचे पत्र सोबत जोडले आहे.

जागतिक तापमानातील वाढ आणि ऋतू बदल या पार्श्वभूमीवर आणि राज्यातील वनक्षेत्र २०% वरुन ३३% पर्यंत नेण्याचा भाग म्हणून वृक्षारोपणाची गती तुटु न देता त्यामध्ये सातत्य ठेवावे, अशा निर्णय शासनान घेतला आहे. त्यानुसार पुढील ३ वर्षात ५० कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्याबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : सावधि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११, दि.१०.१०.२०१६ अन्वये कृती कार्यक्रम तयार करुन अंमलबजावणी करण्याबाबतच्या आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

नियोजित ५० कोटी वृक्षारोपणाचा व संगोपनाचा कार्यक्रम लोकसहभागाव्दारे जन चळवळीत रुपांतरीत करुन यशस्वीपणे राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोकांनी सहभागी होणे गरजेचे आहे. यासाठी " महाराष्ट्र हरित सेना " स्थापित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य नोंदणी करण्यासाठी greenarmy.mahaforest.gov.in या संकेत स्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. या संकेत स्थळावर दि.३१.०३.२०१७ पर्यत किमान १ कोटी लोकांनी स्वयंस्फूर्तीने स्वयंसेवक म्हणून या उपक्रमाचे सदस्य म्हणून नोंदणी करावी, असे अपेक्षित आहे.

महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य असलेल्या सभासदांना वृक्ष लागवड, संगोपन, वन व वन्यजीव आणि वन विभागातील संबंधीत क्षेत्रामध्ये आपले योगदान देता येईल. तसेच या उपक्रमात उत्तम काम करणा-या सभासदांना बक्षिस योजना व इतर सवलतीव्दारे सन्मानित करण्याची योजना विचाराधीन आहे. नोंदणीची पद्धत अत्यंत सोपी सोपी असून सदर संकेत स्थळावर आवश्यक माहिती भरल्यानंतर सभासद नोंदणी प्रमाणपत्र यंत्रणेत तयार होवून सदस्याच्या मेल आयडीवर पाठविले जाते.

आपल्या उपविभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी, कर्मचारी, त्यांचे कुटुंबिय, आप्तेष्ठ, मित्र परिवार, सामाजिक, शैक्षणिक आणि इतर क्षेत्रात काम करणा-या अशासकीय आणि खाजगी संस्था यांना महाराष्ट्र हरित सेनेमध्ये सदस्य नोंदणी करण्याबाबत आवाहन करण्यात येत असून लोकोपयोगी आणि सध्याच्या व भविष्यातील पिढीला उत्तम व सुरक्षित पर्यावरण देण्याच्या उपक्रमात सक्रीय सहभाग घेऊन सदस्य नोंदणी करावी, ही विनंती.

आपला,

(रा. वि. जाधव)
कक्ष अधिकारी , महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

अ.शा. पत्र क्र. : साववि-२०१६/प्र.क्र.१३३/फ-११

महसूल व वन विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ जानेवारी, २०१७

१) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
२) सर्व विभागीय आयुक्त
३) सर्व महानगरपालिका आयुक्त
४) सर्व जिल्हाधिकारी
५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
६) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका (गट-अ)
७) सर्व विभाग प्रमुख

विषय :- वन विभागाच्या "महाराष्ट्र हरित सेना योजनेच्या" संकेत स्थळावर सदस्य नोंदणी करण्याबाबत.

महोदय/महोदया,

राज्यामध्ये १ जुलै, २०१६ रोजी जनतेच्या सहभागाने एकाच दिवशी २ कोटी वृक्ष लागवण्याचे उद्दिष्ट सहज ओलांडले गेले. प्रत्यक्षात एकाच दिवशी २.८३ कोटी वृक्ष लागवड झाली. "लिमका बुक ऑफ रेकॉर्ड" या संस्थेने या आगळया वेगळया आणि नाविन्य कार्यक्रमाची दखल घेतली आहे. आपल्या सर्वांच्या प्रामाणिक, आणि स्वंयस्फुतीने केलेल्या कामामुळे हे यश संपादन करता आले. त्याबद्दल मी आपले मन:पुर्वक आभार मानतो व अभिनंदन करतो.

२. जागतिक तापमानातील वाढ आणि ऋतु बदल या पार्श्वभूमीवर आणि राज्यातील वनक्षेत्र २०% वरुन ३३% पर्यंत नेण्याचा भाग म्हणून, वृक्षारोपणाची गती तुटू न देता, त्यामध्ये सातत्य ठेवावे, असा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार पुढील ३ वर्षात ५० कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्याबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : साववि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११, दिनांक १०.१०.२०१६ अन्वये कृती कार्यक्रम तयार करुन अंमलबजावणी करण्याबाबतच्या आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये शासनाच्या सर्व विभागांचा समावेश आहे.

३. नियोजित ५० कोटी वृक्षारोपणाचा व संगोपनाचा कार्यक्रम लोकसहभागाद्वारे जन चळवळीत रुपांतरीत करुन यशस्वीरित्या राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोकांनी सहभागी होणे गरजेचे आहे. यासाठी **"महाराष्ट्र हरित सेना"** स्थापित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य नोंदणी करण्यासाठी greenarmy.mahaforest.gov.in या संकेत स्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. या संकेत स्थळावर दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत किमान १ कोटी लोकांनी स्वयंस्फुतीने स्वयंसेवक म्हणून या उपक्रमाचे सदस्य म्हणून नोंदणी करावी, असे अपेक्षित आहे.

४. ग्रीन आर्मीचे सदस्य असलेल्या सभासदांना वृक्ष लागवड, संगोपन, वन व वन्यजीव आणि वन विभागातील संबंधित क्षेत्रामध्ये आपले योगदान देता येईल. तसेच या उपक्रमात उत्तम काम करणाऱ्या सभासदांना बक्षिस योजना व इतर सवलतीद्वारे सन्मानित करण्याची योजना विचाराधीन आहे. नोंदणीची पध्दत अत्यंत सोपी असून वर नमूद संकेत स्थळावर आवश्यक माहिती भरल्यानंतर सभासद नोंदणी प्रमाणपत्र यंत्रणेत तयार होवून सदस्याच्या मेल आयडीवर पाठविले जाते.

५. तरी, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व कर्मचारी, अधिकारी, त्यांचे कुटूंबिय, आप्तेष्ट, मित्र परिवार, सामाजिक, शैक्षणिक आणि इतर क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय आणि खाजगी संस्था यांना महाराष्ट्र हरित सेनेमध्ये सदस्य नोंदणी करण्याबाबत कृपया आवाहन करावे. या लोकोपयोगी आणि सध्याच्या व भविष्यातील पिढीला उत्तम व सुरक्षित पर्यावरण देण्याच्या उपक्रमात सक्रीय सहभाग घेण्याबाबत आपणा आणि इतर! सर्वांनी या उपक्रमात सदस्य नोंदणी केल्यास मी आपला अत्यंत आभारी राहीन.

सस्नेह !

आपला

(विकास खारगे)